# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**दोन : प्रश्नोत्तरे.**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री.सुभाष चव्हाण वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्याचे** लक्ष वेधतील **:-**

"दिनांक ३ जून, २०१२ रोजी वा त्यादरम्यान धामापूर (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील तलावात पोहण्यासाठी गेले असता दोघांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडणे, यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याचे आढळून येणे, यामुळे संपूर्ण धामापूर गावात भिती व चिंतेचे वातावरण पसरणे, धामापूर हे पर्यटन स्थळ असून येथे ऐतिहासिक व नैसर्गिकदृष्टया अत्यंत नयनरम्य असलेल्या शिवकालीन तलावात बोटींगसाठी तसेच पोहण्यासाठी पर्यटकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असणे, परंतु पोहण्यासाठी व बोटींगसाठी येणाऱ्या पर्यटकांना येथे कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळत नसणे, येथे अनेकदा घडत असलेल्या अपघातासंबधी तसेच गुन्ह्यांसंबंधी तक्रार करण्यासाठी धामापूर येथे पोलीस चौकी नसल्यामुळे मालवण येथे २० कि.मी. दूरवर तक्रार नोंदविण्यासाठी जावे लागणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मालवण पोलीस ठाणे अंतर्गत धामापूर या पर्यटन स्थळी पोलीस चौकीची निर्मिती करण्याकरीता पोलीस अधिक्षक, जिल्हा सिंधुदुर्ग यांना दिनांक १२ मे, २०१० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्यापी कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे परिसरात तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री.अनिल भोसले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्याचे** लक्ष वेधतील **:-**

"पुणे शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील नागरी सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या

हलगर्जीपणामुळे नॉनक्रेमिलेयर, उत्पन्नाचे व रहिवासी दाखले वेळेवर मिळत नसणे, दाखले वितरणाची ठिकाणे वाढवूनही जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार प्रचंड गोंधळ निर्माण होत असणे, एजटांकडून येणारे अर्ज प्राधान्याने स्विकारले जाणे, मोठ्या प्रमाणात अर्ज गहाळ होणे, दाखले घेण्यासाठी आलेल्या पालकांना व विद्यार्थ्यांना दिवसभर ताटकळत राहावे लागणे, मुदत संपून चार-चार दिवस झाले तरीही दाखले न मिळणे, पुरेसे पुरावे देऊनही अर्ज नामंजूर केले जाणे, स्टॅम्पसाठी जादा पैसे घेतले जाणे, नागरी सुविधा केंद्रातील अर्जाची छाननी करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुरेशी माहिती नसल्यामुळे दाखले घेण्यासाठी आलेल्यांना पूर्ण माहिती मिळू शकत नाही, योग्य वेळेत दाखले न मिळाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता, दाखले घेण्यासाठी आलेले पालक व विद्यार्थी संतप्त होणे, समाजिक संस्थाकडून याबाबत मोठ्या प्रमाणात आंदोलन होत असणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली कारवाई वा करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.दिवाकर रावते, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्याचे** लक्ष वेधतील **:-**

"व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागांतर्गत नागपूर व अमरावती येथील प्रादेशिक कार्यालयातील नियमित व कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती व बढती बाबत सहसंचालकांनी फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करणे, सदर गैरव्यवहारासंदर्भात राष्ट्रीय अपंग विकास महासंघ, अमरावती यांच्यातर्फे दिनांक १६ मार्च, २०१२ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण सचिव यांच्याकडे तक्रारी करणे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २५ व २६ एप्रिल, २०१२ रोजी आणि दिनांक २७ व २८ एप्रिल, २०१२ रोजी अमरावती व नागपूर येथे जाऊन संचालकांनी चौकशी करणे, सदर चौकशीनुसार सहसंचालकांविरुध्द अद्यापी कोणतीही कार्यवाही न करणे, नागपूर व अमरावती या दोन्ही प्रादेशिक कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये सहसंचालकांच्या गैरव्यवहाराबद्दल पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(४) **श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्याचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात विशेषतः विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मलेरिया,

डेंग्यू, अतिसार, गॅस्ट्रो व टॉयफाईड या विविध साथींच्या आजाराने नागरिकांना ग्रासले जाणे, पेंढरी येथील प्रफुल कोडापे या १६ वर्षीय बालकाचा डेंग्यू मूळे झालेला मृत्यू, तसेच स्वाईन फ्लूची मोठ्या प्रमाणात लागण झाल्याचे दिसून येणे, एकटया चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात ४०२ सिकलसेल रुग्णांची नोंद होणे, त्यापैकी एसएस गटात ४१ तर एएस गटात ३६१ रुग्ण असल्याचे दिसून येणे, राज्यातील १९ जिल्ह्यात असलेल्या सुमारे १५ लाख सिकलसेलचे रुग्णांपैकी विदर्भात २ लाखाच्या जवळपास रुग्ण आढळून येणे, परंतु यावरील उपाययोजना म्हणून प्रयोगशाळा मुंबई व पुणे येथे असणे, त्यामुळे विदर्भातील रुग्णाची होत असलेली गैरसोय, चंद्रपूर जिल्ह्यात मे, २०१२ मध्ये उष्मघातामुळे १२ जणांचा बळी जाणे, चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयातील सि.टी.स्कॅन, एक्स्रे सारखे महत्वाच्या डॉक्टरांच्या कमतरतेमुळे रुग्णाचे योग्य उपचार होत नसल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, रुग्णांना बाह्य उपचारासाठी आर्थिक भुंदड सोसावा लागणे, शासनाने यावर तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

पाच : **विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर

***दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत***

सहा : **शासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ -**

सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२.

सात : **(मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव)-**

**सर्वश्री. हेमंत टकले, विक्रम काळे, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, अनिल भोसले, श्रीमती अलका देसाई, श्रीमती उषाताई दराडे सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, रमेश शेंडगे, श्रीमती दिप्ती चवधरी श्री.चरणसिंग सप्रा वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव-**

"राज्यातील बऱ्याच भागात सुरूवातीला पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणीला केलेली सुरूवात, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती,

शेतकऱ्यांनी १५ लाख हेक्टरवर सुमारे ४५० कोटी रुपयांची बियाणे व खते खरेदी करुन पेरणी करणे, परंतु आता पिके करपल्यामुळे दुबार पेरणीचे ओढवलेले संकट, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज पुरवठा न होणे, परिणामी शेतकऱ्यांना सावकाराकडून जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागणे, शेतीचा वाढलेला खर्च, अपुऱ्या पावसामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेदिवस कमी होणे, राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई, विदर्भात ४३०० गावांना भीषण पाणीटंचाई निर्माण होणे, पिण्याच्या पाण्यासाठी महिलांनी मोर्चे काढून निदर्शने करणे, गुरांच्या चाऱ्याचा व त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, शासनाने ठिकठिकाणी चारा डेपो उघडणे, परंतु तेथे होत असलेला भ्रष्टाचारामुळे व चाऱ्याअभावी शेतकऱ्यांना त्यांची जनावरे कमी दराने विकावी लागणे, गावांत रोजगार मिळत नसल्यामुळे राज्यातील शेतकरी विशेषतः विदर्भातील शेतकरी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे कुटुंबियांसह स्थलांतरित होणे, दुष्काळाचा सामना करण्यासाठी राज्यात शेततळी निर्माण करण्याची तसेच अवर्षणप्रवण भागात जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची नितांत आवश्यकता, राज्यात दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन अद्यापी त्या मंडळाला निधी देण्यात आला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे, केंद्र शासनाची असलेली आर.आर.आर.योजना राज्यात राबविण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे १९७२ सालच्या पाझर तलावाच्या दुरूस्तीचा निधी उपलब्ध न होणे, प्रलंबित असलेला निधी व त्यानंतरच्या कोल्हापूर टाईप बंधारे व पाझर तलावांच्या दुरूस्तीचा निधी मिळण्याची आवश्यकता, दुष्काळ जाहिर करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य बाजारपेठ व भाव मिळणेबाबत तसेच विविध वित्तीय संस्था व बँकाकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासन दूध प्रकल्पांना कोट्यवधीचे अनुदान देत असतानाही सहकारी व खाजगी दूध प्रकल्पातील दूधात घातक रसायनांचे मिश्रण करीत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास

निदर्शनास येणे, शेतकऱ्यांकडून कमी दराने दूध विकत घेऊन रसायने मिसळून राज्यात विशेषतः बारामती, मुंबई, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र कर्नाटक सीमा येथे मोठ्या प्रमाणात दूध भेसळ होणे, वनस्पती तेल, प्राण्यांची चरबी, हायड्रोजन पेरॉक्साईड, स्टार्च, ग्लुकोज, माल्टोज, फुक्टोज, मीठ, गव्हाचे पीठ, तांदळाचे पीठ वापरुन हे दूध तयार करण्यात येत असणे, दूध सम्राटांना राजकीय पाठींबा असणे, राज्याच्या अन्न व औषधे प्रशासनाकडून कारवाईबाबत दिरंगाई होत असणे, कारवाई होत नसल्याने भेसळयुक्त दूधाची विक्री सुरु असणे, दूध भेसळ करणाऱ्या संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनावर तसेच अन्न व औषधे विभागाच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात सहशिक्षण प्रणाली असल्याने मुले-मुली एकाच शाळेत शिकणे, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने प्रत्येक शाळेमध्ये वापरण्यायोग्य स्वतंत्र स्वच्छता गृहे मिळण्याचा विद्यार्थ्यांचा हक्क असणे, शाळांमध्ये स्वतंत्र स्वच्छता गृहे नसल्याने व असणारी स्वच्छता गृहे वापरण्यायोग्य नसल्याने विद्यार्थांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होणे, अनेक विद्यार्थी यामुळे आजारी पडणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने दखल घेऊन राज्य शासनास निर्देश देणे, अद्यापही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.